तात्काळ/अर्थसंकल्पीय प्राधान्य/कालमर्यादा

फॅक्स नं.(०२२)२२८८५०४४/२२८८५

महाराष्ट्र शासन

क्रमांक :- आसुअ २०१०/प्र.क्र.५४/(४१)/अ-२
विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ मार्च, २०११.

प्रति,

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- सन २०१०-११ या वर्षाकरिता सुधारित अनुदानाचे वाटप
"मागणी क्रमांक जे-२, २०७०, इतर प्रशासनिक सेवा"

महोदय,

उपरोक्त विषयाधीन मुख्यलेखाशिर्षाखालील सन २०१०-११ या वित्तीय वर्षाचे उद्दिष्टनिहाय सुधारित अनुदान वाटप सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्य करण्यात येत आहेत.

२. सर्व प्राक्कलन अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, विवरणपत्र अ व ब मध्ये दर्शविलेल्या प्रत्येक रकान्यामधील तरतुदी या चालू वित्तीय वर्षामध्ये **आठमाही सुधारित अनुदान म्हणून मंजूर करण्यात आल्या आहेत** त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक उद्दिष्टनिहाय मंजूर तरतुदीपेक्षा अधिक खर्च होणार नाही. तसेच खर्चात अनियमितता होणार नाही याची विशेष दक्षता घेण्यात यावी. यासंदर्भात अर्थसंकल्पीय नियमपुस्तिकेतील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या उद्दिष्टाखाली अनुदानामध्ये आपल्या कार्यालयाकरिता तरतुदीमध्ये घट आली आहे तेवढी घट तात्काळ अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे शासनास परत करावी. ज्या उद्दिष्टाखाली अनुदान वाढ करण्याचे स्विकृत केले आहे,त्या उद्दिष्टाखालील अतिरिक्त अनुदान पूरक मागणीद्वारे उपलब्ध होणार असल्याने असे अनुदान पूरक मागणी वितरित झाल्याशिवाय खर्च करण्यात येऊ नये.

३. प्राक्कलन अधिकाऱ्यांनी संबंधित तपशीलवार उपशीर्षनिहाय उद्दिष्टनिहाय सुपूर्द केलेले अनुदान विचारात घेऊन, दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत होणाऱ्या अचूक खर्चाचे अंदाज संपूर्ण तपशीलवार विवरणपत्रासह बचतीचा अहवाल **सोबतच्या विवरणपत्रामध्ये कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३० मार्च,२०११ पूर्वी शासनास प्राप्त होतील याबाबत विशेष काळजी घेण्यात यावी.**

४. **संबंधित प्राक्कलन अधिकाऱ्यांचे** लक्ष शासन परिपत्रक क्रमांकः पीएसी १४८८/१४३४/का १५, दिनांक ५ एप्रिल, १९९१ कडे वेधण्यात येत असून त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्याकडे सुपूर्द केलेल्या अनुदानात जर बचत स्पष्ट होत नसली तरीही बचतीचा अहवाल **विहित तारखेपूर्वी** न चुकता पाठवावयाचा असल्याने जर कार्यालयांकडे विनिर्दिष्ट प्रयोजनार्थ तरतूद सुपूर्द केलेली आहे त्याच प्रयोजनासाठी जेवढी रक्कम वापरण्यात आली ती वगळता उर्वरित रक्कम इतरत्र न वापरता निव्वळ बचतीची रक्कम म्हणून कारणे व समर्थनासह विनिर्दिष्टपूर्वक मार्च कपात करुन परत केली तरच त्यास बचतीची रक्कम म्हणून समजण्यात येईल.

५. बचतीसंबंधात अपेक्षेपेक्षा खर्च कमी अथवा अनुदान उशिरा प्राप्त झाले आणि अधिक खर्चासंबंधात अपेक्षित अनुदान कमी मिळाले अशा प्रकारची बचत/वाढीचे समर्थन/कारणे नमूद न करणे अर्थसंकल्पीय नियंत्रणाच्या दृष्टीकोनातून योग्य ठरत नाही, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

आपला
(सि.श्री.पाटील)
कार्यासन अधिकारी

प्रति:- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा)-एक, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा)-दोन, महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (दोन प्रती),
वित्त विभाग (व्यय ६, अर्थसंकल्प १०),
विधी व न्याय विभाग, कार्यासन-१७, २४ (दोन प्रती)
निवड नस्ती

विवरणपत्र — "अ"

सन २०१०-११ च्या बचतीच्या रक्कमा परत करण्याबाबतचा अहवाल

लेखाशीर्ष :- २०७०, इतर प्रशासनिक सेवा

उपशीर्ष :-

(रुपयामध्ये)

तपशीलवार लेखाशीर्ष	मंजूर अनुदान	दिनांक २८.२.१० पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च	उर्वरित कालावधीतील संभाव्य खर्च	एकूण (३+४)	बचत (-) किंवा वाढ (+)	बचत/वाढीची सुस्पष्ट कारण (रकाना रिक्त ठेवू नये)
१	२	३	४	५	६	७

(शासन ज्ञापन, विधी व न्याय विभाग क्रमांक- आसुअे २०७०/(प्र.क्र.५४/११)/ का.२३, दिनांक [illegible] मार्च,२०११ चे सहपत्र)

<u>विवरणपत्र</u> — ४

(रुपये हजारात)

उपलेखाशीर्ष/गौणलेखाशीर्ष/उद्दिष्ट	सन २०१०-११ या वित्तीय वर्षासाठी सुधारित अनुदान
८००, इतर खर्च (दत्तमत)	
<u>८०० (००) (०१)- धर्मादाय आयुक्त (२०७० ०४४ १)</u>	
वेतन	[illegible]
अतिकालीक भत्ता	[illegible]
दुरध्वनी, वीज, पाणी शुल्क	[illegible]
कंत्राटी सेवा	[illegible]
प्रवास खर्च	[illegible]
कार्यालयीन खर्च	[illegible]
इतर खर्च	२०
संगणकावरील खर्च	[illegible]
सुट्टीच्या कामाबद्दल रोख भत्ता	[illegible]
इतर खर्च	[illegible]
एकूण ८०० (००) (०१)	२९४४२
<u>८०० (००) (०२) संस्था नोंदणी अधिनियमांची अंमलबजावणी (२०७० ०४५ २)</u>	
वेतन	[illegible]
एकूण ८०० (००) (०२)	१९०१
<u>८०० (००) (०३)- धर्मादाय आयुक्तांचा विभागीय कर्मचारी वर्ग (२०७० ०४६ १)</u>	
०१-वेतन	[illegible]
०३- अतिकालिक भत्ता	[illegible]
१०- कंत्राटी सेवा	[illegible]
११- प्रवास खर्च	[illegible]
१३-कार्यालयीन खर्च	[illegible]
०६- दुरध्वनी, विज व पाणी शुल्क	[illegible]
१४-भाडे,पट्टी व कर	[illegible]
१७- संगणकावरील खर्च	[illegible]
एकूण ८०० (००) (०३)	२५९५९४
एकूण, २०७०,इतर प्रशासनिक सेवा	[illegible]